# बृहन्मुंबई महानगरपालिका

वरिष्ठ निरिक्षक अनुज्ञापन खाते यांचे कार्यालय 'ई' विभाग मनपा कार्यालय इमारत रुम नं.३३, दुसरामजला,
१० शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा(प.), मुंबई -४०० ००८

**क्र.सआ/ई / १०६ /अति.निर्मु. दि. १९.०७.२०२४**

**विषय:** 'ई' विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगारांची नेमणूक स्थानिक बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडून करण्याकरिता म.न.पा च्या संकेत स्थळावर जाहिरात प्रदर्शित करणेबाबत.

**संदर्भ:** उप आयुक्त (परि-०१ ) यांची दि. १६.०७.२०२४ रोजी एमडीबी /१९८३ अन्वये मंजुरी .

उपरोक्त संदर्भित विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,'ई' विभागातील अनुज्ञापन खात्याच्या अतिक्रमण निर्मुलन विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगारांची नेमणूक करावयाची आहे. या कामासाठी एका स्थानिक बेरोजगार सेवा सहकारी संस्थेची निवड करण्याबाबतची जाहीर सुचना म.न.पा संकेत स्थळावर प्रदर्शित करावयाची आहे.

सदर जाहीर सूचन कृपया म.न.पा. संकेत स्थळावर दि. २०.०७.२०२४ ते २४.०७.२०२४ या कालावधीमध्ये प्रदर्शित करण्यात यावी. सोबत जाहीर सुचनेची प्रत जोडण्यात आलेली आहे.

सही /-

**सहाय्यक आयुक्त 'ई' विभाग**

**ए.बी.एम.पीएमओ(सॅप प्रोजेक्ट)**

# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

<u>वरिष्ठ निरिक्षक अनुज्ञापन खाते यांचे कार्यालय 'ई' विभाग मनपा कार्यालय इमारत रुम नं.३३, दुसरामजला,</u>
<u>१० शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा(प.), मुंबई -४०० ००८</u>

**क्र.सआ/ई / १०६ /अति.निर्मु. दि. १९.०७.२०२४**

## <u>जाहिर सूचना</u>

**विषय:** 'ई' विभागामध्ये अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगार स्थानिक बेरोजगार सेवा सहकारी संस्थेमार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहिर सूचना .

'ई' विभागामध्ये सन २०२४ -२०२५ या आर्थिक वर्षातील दि. ०१.०८.२०२४ ते २३.१२.२०२४ या १४५ दिवसांच्या (रविवार व सार्वजनिक सूट्टी वगळून) कालावधीकरिता, अतिक्रमण निर्मुलन वाहनावर काम करण्याकरिता स्थानिक बेरोजगार सेवा सहकारी संस्थेकडून कंत्राटी कामगार पुरवण्याबाबत, पात्रता यादी तयार करून, सोडत पध्दतीने निवड करून काम करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. या निवड झालेल्या संस्थेकडून प्रतिदिन ०८ तासाकरिता एकूण ०६ कामगारांची आवश्यकता आहे.

अर्जाचा नमूना वरिष्ठ निरिक्षक, अतिक्रमण निर्मुलन (अनुज्ञापन खाते )'ई'विभाग खोली क्र. ३३, दुसरा मजला , १० शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा(प.), मुंबई -४०० ००८ यांच्याकडे रू १३२०/- अधिक १८% जीएसटी असे रोख स्वरूपात (ना-परतावा ) **दि. २०.०७.२०२४ ते २४.०७.२०२४** या कालावधीत सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यत मिळू शकेल. निकषानुसार पात्र सूचीमधून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या एका संस्थेला कामाचे वाटप ई विभागाचे सहाय्यक आयुक्त कामाच्या अटी व शर्तीनुसार करतील. सोडत पध्दतीची निकाल प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार, सहाय्यक आयुक्त 'ई' विभाग यांना राहतील.

अर्ज करण्याची **अंतिम तारीख दि. २४.०७.२०२४ (दुपारी ०१ वाजेपर्यंत** ) राहील. त्यानंतर दाखल केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

**दि. २५.०७.२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजता सोडत काढण्यात येईल.**

उपरोक्त निकषामध्ये न बसणा-या संस्थानां कोणतेही कारण न देता अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी .

सही /-

**सहाय्यक आयुक्त ई विभाग .**

**१० शेख हफिझुद्दीन मार्ग, भायखळा(प.), मुं. - ०८**